

# पोटासाठी उत्तर दिशा...
## (भाग २)

**काडीचा आधार मिळाला!**

मालेगाव आलं. मी मोटारीतून उतरलो. एकदोन दिवसांचीच ओळख असलेल्या एका स्वयंसेवकाचं पत्र घेऊन मी इथं आलो होतो. पत्रात काय लिहिलं होतं, ते माहीत असलं, तरी त्याचा प्रत्यक्ष निकाल काय लागेल, त्याची कल्पना नव्हती. नाशिकच्या उदाहरणानं मन शंकित बनलं होतं. पण तसाच धीर करून वसंतवाडी शोधून काढून श्री. सी. वाय. काळे यांच्या घरी पोचलो. त्यांना नमस्कार करून पत्र दिलं आणि काय आश्चर्य! पत्र वाचल्याबरोबर त्यांनी प्रेमानं बसायला सांगितलं. इतकंच नव्हे, तर 'आपण कार्यक्रम करू', असं आश्वासनही दिलं.

हे त्यांचे शब्द ऐकल्यावर माझा सारा शीण एकदम नाहीसाच झाला. काळ्यांनी मला त्यांच्याच घरी ठेवून घेतलं. तीन-चार दिवस खूप मेहनत घेतली आणि मालेगावच्या राजेबहाद्दरांच्या वाड्यात माझा कार्यक्रम घडवून आणला. कार्यक्रम खरोखरीच छान झाला. या कार्यक्रमासाठी मालेगावचे श्री. वाड यांचीही मदत झाली.

अज्ञातात मारलेल्या उडीनंतरचा अनपेक्षितपणे मिळालेला हा पहिलाच आधार होता. कार्यक्रमाचे पाच रुपये मिळाले. पाच रुपये आज काही वाटत नसतील, पण त्या वेळच्या माझ्या परिस्थितीत ते पाच रुपये म्हणजे पंचप्राणांचं मोल असलेली अमूल्य वस्तू होती. त्या पाच रुपयांचं मोल त्यानंतर मला मिळालेल्या लक्षावधी रुपयांनी होऊ शकलेलं नाही. ते पाच रुपये म्हणजे मला मिळालेला 'संजीवनी मंत्र' होता. माझ्या पुढच्या आयुष्याच्या वाटचालीचं द्वार त्या पाच रूपयांनी उघडलं होतं. रायकरचा नाशिकला आलेला राग क्षणात मावळला. मी मनोमन त्याची क्षमा मागितली. माझ्या आयुष्यात नाशिकचा तो स्वयंसेवक आणि श्री. सी. वाय. काळे यांना अत्यंत आदराचं स्थान आहे. त्यांच्यामुळंच मी आजच्या दिवसापर्यंत पोचलो. मालेगावला कार्यक्रम झाला नसता, तर मी भिकारी होऊन भीक मागितली असती, कदाचित गुन्हेगार झालो असतो किंवा आत्महत्या केली असती.

मालेगावहून धुळं जवळ होतं. तिकीटही मामुली होतं. पाच रुपये मिळाल्याबरोबर मला तीन आणे मामुली वाटू लागले. धुळ्याची वाट धरली. धुळ्याला रमेश खैरनार

नावाचा स्वयंसेवक मित्र झाला होता. मुंबईला तो यापूर्वी काही वेळा आलेला असताना त्याचा उत्तम परिचय झालेला होता. सरळ त्याच्याकडे गेलो. त्यानं, त्याच्या आई-वडिलांनी प्रेमानं माझं स्वागत केलं.

गणेशोत्सव अगदी जवळ आलेला होता. रमेश खैरनार आणि इतर काही संघ-कार्यकर्त्यांनी गणेशोत्सवात माझे कार्यक्रम ठेवण्यासाठी खटपट केली. त्यांच्या खटपटीला यशही आलं. माझे चार-पाच कार्यक्रम धुळ्यात झाले. अमळनेरलाही दोन झाले. अमळनेरला एका स्वयंसेवकाच्या खोलीवर राहिलो. तिथली एक आठवण अजून ताजी आहे. सकाळी गेल्या गेल्या त्यानं चहा करून दिला. असा चहा मी पूर्वी कधीच प्यायलो नव्हतो. नुसत्या दुधाचा तो चहा होता. तिथले एक शिक्षक आणि संघ-कार्यकर्ते श्री. गजाभाऊ पाठक यांचा दाट परिचय त्या वेळी झाला. जे जे लोक त्या काळात माझ्याशी अतिशय प्रेमानं वागले, त्यांची आठवण मी कधी विसरलो नाही. त्यांच्या आठवणीनं मला सदैव आनंद मिळतो.

धुळं आणि अमळनेर या दोन्ही गावांची एक विशेष आठवण मला आहे. त्या गणेशोत्सवात माझे चार-पाच सार्वजनिक कार्यक्रम झाले आणि दोन खाजगी झाले. सार्वजनिक कार्यक्रम जसे गाण्यांनी गाजले, तसेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त गाजले ते त्या कार्यक्रमात झालेल्या मारामाऱ्यांनी. त्या वेळी खानदेशात, विशेषत: अमळनेर धुळे भागांत 'संघ' आणि 'दल' यांचं एकमेकांशी अतिशय विरोधी नातं होतं. माझे कार्यक्रम संघवाल्यांनी घडवले असल्यामुळं दलवाल्यांनी ते उधळण्याचा प्रयत्न प्रत्येक कार्यक्रमात केला. साहजिकच मारामाऱ्या, किरकोळ दुखापती वगैरे प्रकारही झाले. पण इतकं होऊनही त्यांतला एकही कार्यक्रम बंद पडला नाही. थोडी दंगल होई, तेवढा वेळ गडबड असे. दंगल शांत झाली की, कार्यक्रम पुन्हा पुढं सुरू होई. ऐकायला आलेले कुणी उठून जात नसे. संघ आणि दल यांच्यातल्या वैरभावाची कल्पना मला धुळ्याला आल्यावरच प्रत्यक्ष अनुभवाला आली. त्यापूर्वी ऐकूनही त्याची माहिती नव्हती. सानेगुरुजींचं वास्तव्य अमळनेरला होतं. त्यामुळे दलाची वाढ आणि त्याचा प्रभाव काही प्रमाणात त्या भागात होता. संघाचाही प्रभाव वाढत्या प्रमाणात होता. साहजिकच दोन भिन्न मतप्रणालींच्या अनुयायांमध्ये असे झगडे होत असत. मला मात्र त्याचा प्रत्यक्ष अनुभव या वेळी आला.

वास्तविक माझ्या धुळ्याला किंवा अमळनेरला येण्यामागे दलाला विरोध करण्याचा किंवा संघाला प्रभावी बनवण्याचा उद्देश नव्हता. मी बिचारा पोटासाठी लाचार होऊन कार्यक्रम मिळविण्यासाठी धडपडत होतो. माझे परिचित संघात होते, त्यामुळे साहजिकच त्यांनी माझ्यासाठी खटपट केली. पण संघाच्या लोकांनी कार्यक्रम केले, म्हणून दलाच्या सैनिकांनी ते उधळण्याचा प्रयत्न केला. मी कुठल्याही राजकीय मतप्रणालींची गाणी म्हणत नव्हतो. नाही म्हणायला, स्वा. सावरकरांनी रचलेल्या बाजीप्रभू देशपांड्यांच्या पोवाड्याचं नमन मी म्हणत असे. पण त्यामुळे कुणाच्या भावना दुखावल्या जात असतील, असं वाटत नाही. खरा प्रश्न त्या भागात प्रभाव कुणाचा असावा, हा असावा.

धुळ्याला अनेकांच्या दृढ ओळखी झाल्या. त्या साऱ्यांची नावं आजही मला आठवतात. दोन विशेष ओळखी म्हणजे धुळे जिल्ह्याचे संघचालक व तिथले प्रख्यात वकील श्री. त्र्यं. व्यं. तथा भाऊसाहेब कुलकर्णी आणि विश्वास कुंटे. भाऊसाहेब कुलकर्णी गांधीवधानंतर झालेल्या जाळपोळीत आणि दंगलीत चांगलेच होरपळून निघाले आणि त्यानंतर ते पुण्यात स्थायिक झाले. त्यांचं आजतागायत माझ्यावर पुत्रवत प्रेम आहे. श्री. विश्वास कुंटे माझे साडूच बनले. ते चित्रपट व नाट्यसृष्टीत उत्तम नट म्हणून गाजलेले आहेत.

## पैशाची चिंता मिटली

धुळ्याला आणि अमळनेरला झालेल्या सहा-सात कार्यक्रमांचे मिळून मला तीस-पस्तीस रुपये मिळाले. पैशांची चिंता कमी झाली. पण मन सारखं मुंबईकडे ओढ घेत होतं. मोठ्या कष्टानं तो विचार मी मनातून काढून टाकत होतो. आणखी एक गोष्ट झाली होती. खाण्यापिण्याची आणि राहाण्याची चिंता मिटली होती. नाशिक सोडल्यापासून घरचं अन्न मिळत होतं. त्यामुळे थोडीफार शक्ती आणि तरतरी आली होती. मनाला सारखं बजावत होतो की, आता मुंबईला जायचं, ते भरपूर पैसे मिळवून. तोपर्यंत तो विचार करायचा नाही. पैसे मिळवायचा मार्ग सापडला होता. त्यात लाचारी होती, पण उसनवारी नव्हती.

अमळनेरला शेवटचा कार्यक्रम झाला आणि तिथून 'तापी व्हॅली रेल्वे'नं धरणगावला आलो. त्या भागातल्या गावांची आता नकाशा घेऊन मी माहिती घेतली. भाऊसाहेब कुलकर्ण्यांनी धरणगावच्या डॉ. पापरीकरांना एक पत्र दिलं. त्या पत्राच्या आधारावर त्यांच्याकडे जाऊन पोचलो. आता भीती वाटत नव्हती. डॉ. पापरीकरांनीही अतिशय प्रेमानं माझं स्वागत केलं.

काही काही व्यक्तींचे पूर्वजन्मीचे ऋणानुबंध असतात की काय नकळे. डॉ. पापरीकरांच्या साऱ्या कुटुंबानं हा प्रत्यय मला दिला. त्यांच्या घरी गेल्यावर अगदी थोड्या वेळातच सारा परकेपणा नाहीसा झाला. त्यांनी त्यांच्या घरीच कार्यक्रम केला. आता माझ्यात बरीच शक्ती आली होती. आवाज छान लागत होता. लोक गाण्यावर खरोखरीच संतुष्ट असत.

ख्याल, जलद चीज, तराणा, ठुमरी, एखादं नाट्यगीत, व्हरायटी म्हणून बाजीप्रभूंच्या पोवाड्याचं नमन. 'प्रभात'च्या चित्रपटांमधलं एखादं गाणं, शेवटी भैरवी असं माझ्या कार्यक्रमाचं स्वरूप असे. मालेगावपासून प्रत्येक ठिकाणी तबलजी आणि पेटीवादक यांची व्यवस्था होत असे. माझ्या पैशांतून मला त्यांची बिदागी द्यावी लागत नसे. मला त्या वेळी पेटी वाजवून गाता येत नव्हतं. डॉ. पापरीकरांच्या घराशी माझे असे संबंध जुळले की, पुढं त्या भागात म्हणजे जळगाव, भुसावळ भागात मी आलो की, धरणगावला विश्रांतीसाठी दोन-तीन दिवस जाऊन राहात असे.

डॉ. पापरीकरांनी एरंडोलच्या श्री. तात्यासाहेब जोशींना पत्र दिलं. त्यांनीही डॉक्टरांच्या

पत्राचा आदर केला. त्यांच्या घरीच राहिलो. त्यांनी गावातील प्रतिष्ठितांना बोलावून चार-चार आणे वर्गणी करून कार्यक्रम केला. एरंडोलला एक गमतीचा अनुभव आला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी मी जळगावला जायला निघालो. तात्यासाहेब जोशी मला बरोबर घेऊन कोर्टात गेले. त्यांनी आदल्या रात्री कार्यक्रमाला आलेल्या पण वर्गणी द्यायची राहिलेल्या दोन वकिलांना गाठलं, त्यांच्याकडून चार-चार आणे वसूल केले आणि मला दिले!

जळगावला आलो. रामभाऊ प्रभुदेसाईंच्या घरी उतरलो. प्रत्येक गावातून दुसऱ्या गावी जाताना पत्रं मिळत असत. आता सगळा साचा ठरून गेला होता. जळगावला कार्यक्रम झालाच, पण प्रभुदेसाई कुटुंबाशी घनिष्ट संबंध जडला. अजूनही मी जळगावला जातो, तेव्हा न चुकता त्यांच्या घरी जातो आणि अगदी पहिल्यासारख्याच प्रेमानं ती मंडळी माझं स्वागत करतात.

जळगावहून रावेरला आलो. डॉ. आठवल्यांच्या घरी राहिलो. कार्यक्रम झालाच, पण संबंधही चांगले जुळले. तिथला एक आठवणीत राहिलेला प्रसंग म्हणजे नुकतीच प्रकाशित झालेली किंवा होण्याच्या अवस्थेत असलेली श्री. विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' नावाची एक अप्रतिम कादंबरी वाचायला मिळाली. डॉ. आठवले आणि श्री. विश्राम बेडेकर हे दोघे जवळचे मित्र, त्यामुळे त्यांच्याकडे ते पुस्तक आलेलं होतं. त्या पुस्तकाचा प्रभाव अजूनही माझ्या मनावर आहे. मी वाचलेल्या काही अत्यंत परिणामकारक पुस्तकांपैकी 'रणांगण' हे एक आहे.

गेल्याच वर्षी डॉ. आठवल्यांच्या डॉ. चिरंजीवांनी माझा कार्यक्रम आग्रहानं रावेरला घडवून आणला. त्यांच्याच घरी उतरलो. ३८-३९ वर्षांनंतर पुन्हा साऱ्या पूर्वस्मृती जाग्या झाल्या. तेव्हाचा 'मी' डॉ. आठवल्यांच्या स्मरणात अजूनही जसाच्या तसा आहे.

रावेरहून फैजपूरला आलो. फैजपूर हे गाव त्या काळात माझं विसाव्याचं ठिकाण झालं होतं. या गावात माझे पाच-सहा कार्यक्रम झाले. डॉ. सावखेडकरांच्या घरी मी राहिलो होतो. जातीनं नाभिक असलेले हे डॉक्टर गावामध्ये चांगली मान्यता मिळालेले होते. डॉ. सावखेडकर, श्री. वाणी, पोस्टमास्तर श्री. बापट, श्री. विनायकराव वर्तक, संघ कार्यकर्ते श्री. सावरकर अशी कितीतरी नावं सांगता येतील की, ज्यांनी मला अतिशय जिव्हाळा दिला. श्री. वर्तक स्वत: इंजिनियर होते व गातही उत्तम. शास्त्रीय संगीताचा अभ्यास त्यांनी केला होता. आवाजही छान होता.

१९३९ ते १९४१ या काळात मी फैजपूरला चारपाच वेळा गेलो आणि प्रत्येक वेळा तिथल्या लोकांनी माझा कार्यक्रम केला.

मी फिरत राहिलो. गावांची नावं बदलत गेली, पण अनुभव तोच होता. त्यामुळे कार्यक्रमाचं वर्णन फारसं वेगळं करता येणार नाही. पण काही व्यक्तींचा निर्देश कृतज्ञतेनं मला करायलाच हवा.

फैजपूरहून बऱ्हाणपूरला श्री. भाऊसाहेब भुस्कुट्यांच्याकडे गेलो. त्यांनीच कार्यक्रम केला. तिथून खांडव्याला गेलो. तिथं श्री. रायकरांनी कार्यक्रम घडवून आणला.

पुण्याचे ख्यातनाम पंडित अहिताग्नी राजवाडे त्या वेळी खांडव्याला आले होते. त्यांची व्याख्यानं सुरू होती. त्यांचा माझा परिचय होता. त्यांच्या चिरंजीवांच्या लग्नात त्यांनी १९३१ च्या सुमाराला माझं गाणं केलं होतं. खांडव्याला त्यांची व्याख्यानं ऐकली. मनुष्याच्या उत्क्रांतीचा इतिहास हा डार्विनच्या थिअरीप्रमाणे माकडापासूनचा नसून दशावतार हा मनुष्याचा उत्क्रांतीचा खरा इतिहास आहे, ही विचारधारा ते अतिशय प्रभावीपणानं साधार मांडत असत. त्यावरचे त्यांचे ग्रंथही मान्यता पावलेले आहेत.

खांडव्याहून इंदूरला आलो. धुळ्याहून निघताना इंदूरपर्यंत जायचं आणि तिथून मुंबईला परत यायचं, असा एक सुप्त विचार मनात होता. इंदूरला माझा एक जवळचा मित्र बापू घारपुरे राहात होता. १९३६ साली संघाच्या ऑफिसर्स ट्रेनिंग कँपसाठी मे महिन्यात मी कोल्हापूरहून पुण्याला आलो होतो, तेव्हा तोही इंदूरहून आला होता. बापू घारपुरे म्हणजे मुंबई हिंदुमहासभेचे एक बुद्धिमान, प्रभावी, अभ्यासू, निरलस आणि कार्यकर्ता कसा असावा, याचं उत्तम उदाहरण म्हणून सांगता येतील, असे कार्यकर्ते. सैनिकी शिक्षण, सैनिकी जीवन या विषयांचा त्यांचा खूप अभ्यास आहे. शुद्धिकार्यातही त्यांचा मोठा भाग आहे. बापूरावांनी माझ्या पुढच्या अनेक कार्यांत मला बहुमोल सहकार्य केलेलं आहे. अशा त्या वेळच्या बापूच्या गावी म्हणजे इंदूरला जायचं आणि ही भ्रमंती संपवायची, असा विचार आता बळावू लागला होता.

इंदूरला बापूच्या घरी मला काहीच परकेपणा नव्हता. त्याचे वडील तिथल्या संघाचे उपसंचालक होते. बापूच्या घरी मी अगदी स्वत:च्या घरी असल्यासारखा होतो. त्या मुक्कामात खरोखर फार रंगून गेलो. बापूचा राजकारणाचा अभ्यास चांगला होता. मलाही त्यात विशेष रस होता. आणखी एक योगायोग म्हणजे १९३६ साली पुण्याला झालेल्या संघाच्या ऑफिसर्स ट्रेनिंग कँपसाठी पुण्यातूनच आलेला एक स्वयंसेवक विनायक दांडेकर त्या वेळी इंदूरला होता. ३७-३८ साली नागपूरलाही कँपसाठी तो बरोबर होता. आम्हा तिघांच्या रोज बैठका होत. गप्पा होत. विषय मुख्यत: संघाचा, चालू असलेल्या महायुद्धाचा आणि राजकारणाचा असे. विनायक जात्याच बुद्धिमान. प्रत्येक विषयाच्या मुळात जाऊन विचार करणारा. त्या वेळीही संघाशी त्याचे असलेले मतभेद स्पष्टपणे बोलून दाखवणारा. त्याच्याबरोबर वादविवाद करण्यामध्ये एक प्रकारचा आनंद असे. आम्ही त्यावेळी त्याला विनू म्हणत असू. विनायक त्या वेळी इंटर आर्ट्‌सला खाजगी रीतीनं बसण्यासाठी इंदूरला आला होता. त्या वेळीही त्याच्या बुद्धीची चमक स्पष्टपणे दिसत असे. त्याचं वक्तृत्वही चांगलं होतं. हा विनायक दांडेकर म्हणजेच पुण्याचे विख्यात अर्थशास्त्रज्ञ श्री. वि.म. दांडेकर.

इंदूरला बापू, चितळे, सरवटे, भाटे, मनमोझे यांनी मिळून चितळ्यांच्या घरी माझा कार्यक्रम केला. हा माझा इंदूरचा मुक्काम अनेक दृष्टींनी संस्मरणीय होता. कोल्हापूरचे प्रख्यात गवई श्री. रामभाऊ गुळवणी ग्वाल्हेरला दरबार गवई होते. ते त्या वेळी इंदूरला आले होते. त्यांचा आणि माझ्या वडिलांचा निकट परिचय होता. कोल्हापूरला आमच्या घरी ते नेहमी येत असत. मला त्यांनी अगदी लहानपणापासून पाहिलं होतं. माझ्या

लहानपणी माझं गाणंही ऐकलं होतं. त्यांची इंदूरला भेट झाली.

ते मला श्री. रामूभैय्या दाते यांच्या घरी घेऊन गेले. रामूभैयांची ती मूर्ती अजूनही माझ्या दृष्टीसमोर आहे. त्यांचं रुबाबदार व्यक्तिमत्त्व कुणालाही प्रथमदर्शनीच मोहून टाकणारं होतं. सकाळी नऊ ते दुपारी दीडपर्यंत मी त्यांच्या घरी होतो. दोन-अडीच तास मी गायलो आणि त्यानंतर त्यांनी निरनिराळ्या चिजा आणि गजला म्हणून दाखवल्या. निरनिराळ्या चिजांचे मुखडे आणि गजला म्हणणारी त्यांची ती गुलाबी छटा असलेली गोंडस मूर्ती आजही जशीच्या तशी मला दिसते. गजल हा प्रकार खऱ्या अर्थानं त्या दिवशी मला प्रथम ऐकायला मिळाला. गजलेमधला अर्थ, त्या मधली आर्तता, कारुण्य, शृंगार असे सगळे भाव स्वरांतून आणि शब्दांतून सहजपणानं आणि रसीलेपणानं दाखविण्याची त्यांची हातोटी पण चांगली होती. वास्तविक ते गवई नव्हते. गाण्याचा आवाजही त्यांना नव्हता. पण गाणं - तेही रसीलं गाणं - त्यांच्या रोमारोमांत, रक्तात होतं. त्यांनी माझं खूप कौतुक केलं. तंबोरा चटकन स्वरात उत्तम मिळविण्यासाठी त्यांनी मला दिलेली शाबासकी आजही आठवते. इंदूरमधल्या मुक्कामातला तो आनंदाचा आणि भाग्याचा दिवस होता.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)